खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३–२४

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला – लेख



बुधवार, २४ जानेवारी, २०२४ राष्ट्रसंचार 3

# खेडच्या सांस्कृतिक परंपरेचा मानबिंदू

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला

महाराष्ट्राला संत आणि समाजसुधारकांनी केलेल्या प्रबोधनाची उज्ज्वल परंपरा आहे. या प्रबोधनाच्या पीठिकेत 'व्याख्यानमाला' नावाच्या "लोकविद्यापीठाचीही" महत्त्वाची भूमिका आहे. महाराष्ट्रामध्ये वसंत व्याख्यानमालेसारख्या अनेक व्याख्यानमालांचा मराठी माणसाला वैचारिकदृष्ट्या समृद्ध करण्यामध्ये मोलाचा वाटा आहे. आजच्या काळातील नवे विचार, नव्या प्रेरणा विद्यार्थ्यांपर्यंत योग्य पद्धतीने पोहोचवण्यासाठी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने "साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेच्या" रूपाने ही व्याख्यानमाला संस्कृती जोपासली आहे. राजगुरूनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या प्रांगणात होणाऱ्या या व्याख्यानमालेला २१ वर्षांची दीर्घ परंपरा, प्रतिष्ठा आहे. या व्याख्यानमालेत आरोग्य, साहित्य, संस्कृती, अर्थ, राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा व इतर अनेक विषयांवर विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित, मान्यवर, तज्ज्ञ मंडळींची व्याख्याने होत असतात. या निमित्ताने जीवनाच्या सर्व क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या नामवंत, अभ्यासू मान्यवरांना बोलावून त्यांचे विचार ऐकण्याची, त्यांचे कार्य समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना दिली जाते. त्यामुळेच साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला ही राजगुरुनगरच्या सांस्कृतिक जीवनाचा मानबिंदू मानली जाते. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील हे या व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष आहेत.

खेड तालुक्यात संतांची आणि वीरांची परंपरा असलेला वीरत्व आणि वैराग्याच्या परंपरा एकत्र नांदल्या आहेत. या मातीतल्या मावळ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेत साथ दिली. या भूमीत संत ज्ञानदेव आणि संत तुकाराम यांनी वारकरी संप्रदायाच्या आध्यात्मिक विचारांची प्रेरणा दिली. याच भूमीतील हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आत्मबलिदान दिले. कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे, साहित्यिक नामदेव ढसाळ, कवयित्री शान्ता शेळके, माजी सरन्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड असे अनेक दिग्गज खेड तालुक्याच्या मातीत रुजले, बहरले. त्यांच्या कर्तृत्वाने तालुक्याची शान वाढली. या मांदियाळीत शिक्षण क्षेत्रातील माजी आमदार ॲड. साहेबराव बुट्टेपाटील आणि



सहकार क्षेत्रातील माजी आमदार साहेबराव सातकर पाटील यांचा नामोल्लेख होतो. या सर्व महानुभावांच्या प्रेरणादायी जीवनकार्यामुळे राजगुरूनगरला एक अभिमानाची ओळख मिळाली आहे.

शब्दांकन
**डॉ. संजय ज्ञानदेव शिंदे**
उपप्राचार्य, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय. राजगुरुनगर.

सामान्य माणसाच्या जीवनात शिक्षणरुपी ज्ञानदीप लावण्यासाठी माजी आमदार ॲड. साहेबराव बुट्टेपाटील यांनी १९७७ साली हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाची स्थापना केली आणि हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानदीप लावला. ते स्वतः भाषाप्रभू होते. त्यांचे वक्तृत्व, नेतृत्व दिशादर्शक होते. त्यांनी घालून दिलेल्या आचार, विचार आणि मूल्यांचे संवर्धन व्हावे आणि त्यातून पुढील पिढी घडावी या उद्देशाने खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन दि. २६ जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात येते. वक्ता आणि श्रोता यांचा हृदय संवाद घडविणे, भूतकाळाचे विश्लेषण करताना वर्तमानकाळ समजून घेणे आणि भविष्याचा वेध घेताना त्याचे नेमके सूचन करण्याचे काम साहेबरोजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला गेली दोन दशके अविरत करीत आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील विषयांची विविधता, आशयसंपन्न मौलिक विचारधन, प्रतिभावान वक्ते आणि दर्जेदार वक्तृत्व यांचे दर्शन या व्याख्यानमालेतून घडते. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना समाजात यशस्वी झालेल्या व्यक्तिमत्त्वांच्या प्रत्याक्षानुभावाचा आनंद मिळतो आहे. सलग सात दिवस दर्जेदार व्याख्यानाची मेजवानी देणाऱ्या या व्याखानमालेने उत्तर पुणे जिल्ह्यातील सामजिक, सांस्कृतिक, वैचारिक जीवनात स्वतंत्र असे स्थान निर्माण केले आहे. राजगुरुनगरची सांस्कृतिक ओळख साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेच्या रूपाने बनू लागली आहे.

उत्तम आयोजनाचा नमुना असणारी ही व्याख्यानमाला सकाळी बरोबर १० वाजता सुरु होते. व्यासपीठावर फक्त वक्ता आणि समोर सात - आठ हजार विद्यार्थी, पालक, नागरिक श्रोते हे या व्याख्यानमालेचे ठळक वैशिष्टे. गेली दोन दशकात डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. विजय भटकर, पंडित हृदयनाथ मंगेशकर, अभिनेते विक्रम गोखले, निवेदक सुधीर गाडगीळ, उद्योजक हनुमंत गायकवाड, ॲड. उज्ज्वल निकम, डॉ. बालाजी तांबे, माजी निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण, संपादक गिरीश कुबेर, भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाचे माजी सचिव ज्ञानेश्वर मुळे, ह.भ.प. निवृत्तीमहाराज देशमुख यांसारख्या आत्यंतिक प्रतिष्ठीत आणि सर्वांना आदरस्थानी असणाऱ्या अनेक वक्त्यांनी या व्याख्यानमालेची उंची आणि लौकिकात वाढ केली आहे. गेली दोन दशके या सर्व वक्त्यांना निमंत्रित करण्याचे अत्यंत कठीण कार्य ॲड. राजमाला बुट्टे पाटील सातत्याने चिकाटीने, जिद्दीने व निष्ठापूर्वक करीत आहेत. व्याख्यानमालेचा दर्जा टिकून ठेवण्यात त्यांचे योगदान खूप मोठे आहे.

महाविद्यालयीन जीवनात समाजाच्या विविध क्षेत्रात मोठी झालेली माणसं अगदी जवळून अनुभवायला मिळणे हे तसे भाग्यचं. या माणसांची विचारसरणी, त्यांची प्रेरणा, प्रभाव, जडणघडण समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनात अनुभवायला मिळणे त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने खूप आवश्यक असते. विद्यार्थीही लक्षपूर्वक व्याख्याने ऐकतात. महत्त्वाच्या मुद्दयांची टिपणे काढतात. त्यावर चर्चा करतात. वक्त्यांची संवाद साधून प्रश्न विचारतात. यामधून विद्यार्थ्यांनाही वेगळ, नवं, वेगळ्या वाटेने काही करण्याची प्रेरणा मिळत असते. यातून संवेदनशील श्रोते घडतात. त्यामुळे चांगले कानसेन तयार होण्यास मदत झाली आहे. 'मला आवडलेला वक्ता' या विषयावर भव्य निबंध स्पर्धा ही महाविद्यालयात घेतली जाते.

पुरवणी संकलन
**अमितकुमार टाकळकर**
राजगुरुनगर

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभागप्रमुख**